दि. 01/07/2026

# प्रेसनोट

## नांदेड परिक्षेत्रातील गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहिम

### महिनाभरात दहा हजार पानटपऱ्यांची झाडाझडती, (80) गुन्हे दाखल, 1 कोटी 27 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक 01 ते 30 जून, 2026 दरम्यान, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहिम उघडली होती.

नांदेड परिक्षेत्रात राबविण्यात आलेल्या सदर मोहिमे दरम्यान, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम 123 भारतीय न्याय संहितेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात (20), परभणी जिल्ह्यात (23), हिंगोली जिल्हयात (12), तर लातूर जिल्ह्यात (12) असे एकूण (67) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, गांजा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध एनडीपीएस कायद्याखाली नांदेड जिल्हयात (7), परभणी जिल्हयात (3) व लातूर जिल्हयात (3) अशा एकूण (13) करण्यात आल्या आहेत. दोन्ही कायदयान्वये परिक्षेत्रात (80) कारवाया करुन, (111) इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून,यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून 1,27,49,350/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या दरम्यान परिक्षेत्रातील एकूण 10,604 पान टपऱ्यांची झाडाझडती घेण्यात आली आहे.

**परिक्षेत्रातील विविध घटकांनी गुटखा व अंमली पदार्थ विरोधी कारवाया पुढील प्रमाणे :**

| जिल्हा | गुटखा | | | | अंमली पदार्थ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | किती दुकाने/ पानटपऱ्या तपासल्या | BNS 123 चे गुन्हे | जप्त मुद्देमालाची किंमत | आरोपी संख्या | दाखल गुन्हे | जप्त मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या |
| नांदेड | 3,020 | 20 | 48,21,244 | 24 | 7 | 7,00,250 | 11 |
| परभणी | 2,415 | 23 | 17,34,297 | 29 | 3 | 82,400 | 3 |
| हिंगोली | 3,012 | 12 | 6,87,032 | 15 | - | - | - |
| लातूर | 2,157 | 12 | 43,93,477 | 24 | 3 | 3,30,650 | 5 |
| **एकूण** | 10,604 | 67 | 1,16,36,050 | 92 | 13 | 11,13,300 | 19 |

**1 जूलै पासून परिक्षेत्रात अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिम :**

नांदेड परिक्षेत्रात, जूलै महिन्यात अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिम राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेअंतर्गत परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांमध्ये गुटखा, मटका, जुगार, दारू, अंमली पदार्थ, अवैध वाळू उपसा व वाहतूक, वेश्या व्यवसाय, जीवनाश्यक वस्तू अधिनियम, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादी विरुद्ध प्रभावी कारवाई करण्यात येणार असून, परिक्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांना अवैध व्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**'खबर ' हेल्पलाइन ला नागरिकांची पसंती :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिक अवैध व्यवसायांची अचूक माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवत आहेत.

नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी व आपल्या भागातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड